# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता.अलिबाग जि. रायगड पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, ईमेल dycfalibag@mahaforest.gov.in

---

पत्र

विषयः- <u>वनजमीन रायगड.</u>

नागोठणे सब स्टेशन ते वडखळ (डोलवी) 220 के. व्ही. डी. सी. ट्रान्समिशन लाईन टाकणेचा महाराष्ट्र राज्य विद्युत ट्रान्समिशन क. लि. यांचा प्रस्ताव...

जावक क्र. ब/20/जमीन/4888/2015-16.
अलिबाग 402 201. दिनांकः- 4/02/2016.

प्रति,

कार्यकारी अभियंता,
इ.एच.व्ही. कंन्स्ट्रक्शन डिव्हीजन,
कळवा, मु. ऐरोली, ठाणे बेलापूर रोड,
पो.नं. 20, नवी मुंबई- 400 708.

संदर्भः- केंद्रशासन पत्र क्र. एफसी-I/एमएच-18/2015-एनजीपी/40,
दिनांक 20/01/2016.

नागोठणे सब स्टेशन ते वडखळ (डोलवी) 220 के. व्ही. डी. सी. ट्रान्समिशन लाईन टाकणेचा महाराष्ट्र राज्य विद्युत ट्रान्समिशन कं. लि. यांचा वन जमिन मागणीचा प्रस्ताव क्षेत्र 1.8947 हेक्टर यास केंद्रशासनाने वरील संदर्भीय पत्रान्वये तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे.

सोबत सदर पत्राची छायाप्रत आपले सुलभ संदर्भाकरीता जोडून पाठविण्यात येत आहे. प्रकरणी केंद्रशासनाने उक्त तत्वतः मंजूरी पत्रामध्ये घातलेल्या अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

1) अट क्रमांक 2 – प्रस्तावांत वळतेकरणासाठी प्रस्तावीत वनक्षेत्राचे दुप्पट अवनत क्षेत्रावर प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने पर्यायी वनीकरण योजना राबविणेची आहे. सदर योजना 7 वर्षासाठी राबविणेची असून मिश्र प्रजातीचे वनीकरण करण्याचे आहे.

2) अट क्रमांक 3 - वळते होणारे क्षेत्राचे बदल्यांत मौजे वांद्रोशी ता. सुधागड येथील राखीव वन कं. क्र. 653 (ग.क्र.23) हेक्टर अवनत क्षेत्रावर वनीकरण योजना राबविणेची आहे. पर्यायी वनीकरणासाठी सन 2016-17 या वर्षासाठीचा रेडी रेक्नर दर रक्कम रु. 451385/- प्रति हेक्टर याप्रमाणे 3.7894 हेक्टर साठी रक्कम रु. 17,10,478/- (रु. सतरा लाख दहा हजार चारशे आठ्याहत्तर मात्र) भरणा करण्यात यावी.

3) अट क्रमांक 4 - वळते होणारे क्षेत्र 1.8947 हेक्टर ची नेट प्रेझंन्ट व्हॅल्यूची रक्कम प्रति हेक्टर रु. 7,30,000/- याप्रमाणे रु. 13,83,131/-. (रुपये तेरा लाख त्र्याऐंशी हजार एकशे एकतीस) मात्र एवढी भरणा करणे आवश्यक आहे.

4) अट क्रमांक 5 - मा.सुप्रिम कोर्टाने नियुक्त केलेल्या एक्सपर्ट कमिटीचे शिफारसी प्रमाणे अधिकची नेट प्रेझंन्ट व्हॅल्यू रक्कम भरणेस तयार असल्याबाबत बंधपत्र (Undertaking) देणे आवश्यक आहे.

5) अट क्रमांक-7 - दंडात्मक पर्यायी वनीकरण योजना 0.50 हेक्टर अवनत क्षेत्रावर घ्यावयाची आहे. त्यासाठी रक्कम रु. 2,25,693/- चा भरणा करणे आवश्यक आहे.

6) अट क्रमांक 8 – प्रस्तावात आवश्यकता असल्यास पर्यावरण (संरक्षण) कायदा, 1986 नुसार पर्यावरण नाहरकत दाखला प्राप्त करणे बंधनकारक आहे.

7) अट क्रमांक 9 – कोणत्याही प्रकारे वनक्षेत्रांत मजूर कॅम्प उभारता येणार नाहीत.

8) अट क्रमांक 10 - सदर प्रस्तावीत कामाचे बांधकामाकरीता जे मजूर व कर्मचारी कार्यरत असतील त्यांना यथायोग्य इंधन पुरविण्यात यावे जेणेकरुन निकटचे वनक्षेत्रातील वृक्षांची हानी होणार नाही याची दक्षता घेणेची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

9) अट क्रमांक 11 - प्रस्तावीत कामासाठी वळतेकरण करावयाचे क्षेत्र हे जागेवर 4 फुट उंचीचे पक्के सिमेंट पिलर्स लावून व त्यावर मागे व पुढे अनुक्रमांक व पिलर्स मधील अंतर नमुद करुन सिमांकीत करावे.सदर काम हे प्रकल्पयंणेने त्यांचे स्वतःचे खर्चाने करणेचे आहे.

10) अट क्रमांक 12 – प्रस्तावांत नमूद असलेल्या कारणासाठीच वनक्षेत्राचा वापर करता येईल, त्याव्यतिरिक्त कारणासाठी वनक्षेत्राचा वापर करता येणार नाही.

11) अट क्रमांक 13 - सदर प्रकल्पामुळे कोणत्याही प्रकारे वन व वन्यजीवांना हानी वा नुकसान पोहोचणार नाही याबाबत प्रकल्प यंत्रणेने दक्षता घ्यावी.

12) अट क्रमांक 14 - प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावांत सादर केलेला ले-आऊट प्लॅन केंद्रशासनाचे पूर्व परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

13) अट क्रमांक 15 - प्रकल्प यंत्रणेस मान्य करण्यात आलेले वळतीकरण वनक्षेत्र कोणत्याही परिस्थितीत इतर यंत्रणा वा व्यक्ती यांना केंद्रशासनाचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतर करता येणार नाही.

14) अट क्रमांक 16 अ –प्रत्येक वर्षाचे 1 जानेवारी व 10 जुलै रोजी सहामाही पूर्तता अहवाल सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

15) अट क्रमांक 16 ब – राज्य शासनाकडून अटींबाबत संनियंत्रण करण्यांत येऊन प्रत्येक वर्षाचे 31 डिसेंबर रोजीचा अहवाल सादर करण्यांत येईल.

16) अट क्रमांक 17 - आखणी मार्गातील आवश्यकतेनुसार वृक्षांची तोड करण्यांत यावी, तथापी काम पूर्ण झाल्यानंतर त्यातील नैसर्गिक झाडोरा वाढून देणे आवश्यक राहील. तसेच भविष्यांत विदयुत प्रवाहात अडथळा येऊ नये म्हणून आवश्यकतेनुसार स्थानिक वनअधिका-यांचे परवानगीने वृक्षतोड, फांदया छाटणे इत्यादी कामे करता येतील. विदयुत लाईनचे परिरक्षण (maintenance) करणेसाठी एक बाहय पट्टा मोकळा ठेवण्यांत यावा.

17) अट क्रमांक 18 - प्रकल्प यंत्रणेने योग्य ठिकाणी circuit breakers install करणे आवश्यक राहील.

18) अट क्रमांक 19 – स्थानिक वनाधिकारी यांचे परवानगीने मंजुर आखणी मार्गाबाहेरील कन्डक्टर यास बाधा येणा-या वृक्षांच्या फांदया छाटणे आवश्यक असल्यास सदर काम करणे शक्य आहे.

19) अट क्रमांक 20 – सदर लाईन टाकणेसाठी वनक्षेत्रातील अस्तित्वातील रस्ते/मार्ग यांचा वापर करणे शक्य आहे, तथापी नवीन रस्ते/मार्ग तयार करण्यासाठी वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत परवानगी घेणे बंधनकारक राहील.

20) अट क्रमांक 21 – वनक्षेत्रातील मंजुर आखणी मार्गात बदल करता येणार नाही. तसेच वनक्षेत्रातील आखणी मार्गाची रुंदी 35 मीटर राहील.

21) अट क्रमांक 22 – लाईन टाकणसाठी मशिनरी/सामान यांची वहातुक करणेसाठी प्रत्येक कन्टक्टरच्या खाली 4.6 मीटर रुंदीपर्यंतचे वृक्षांची तोड करणेस परवानगी आहे. भविष्यांत सदर वृक्षतोड ही 4.6 मीटर रुंदीपर्यंत मर्यादीत राहील. मंजुर आखणी मार्गातील आवश्यकतेनुसार वृक्षांची तोड करण्यांत यावी, तथापी काम पूर्ण झाल्यानंतर त्यातील झाडोरा वाढून देणे आवश्यक राहील. तसेच भविष्यांत विदयुत प्रवाहात अडथळा येऊ नये म्हणून आवश्यकतेनुसार स्थानिक वनअधिका-यांचे परवानगीने वृक्षतोड, फांदया छाटणे इत्यादी कामे करता येतील. विदयुत लाईनचे परिरक्षण (maintenance) करणेसाठी एक बाहय पट्टा मोकळा ठेवण्यांत यावा.

22) अट क्रमांक 23 – ट्रान्समिशन लाईनचे परिरक्षण करणेसाठी एक बाहय पट्टा मोकळा ठेवणे आवश्यक राहील.

23) अट क्रमांक 24 – राज्य वनविभागाचे सल्ल्याने प्रकल्प यंत्रणेचे खर्चाने प्रस्तावीत ट्रान्समिशन लाईनचे आखणी मार्गात, लाईन खाली ड्रॉफ्ट (प्राधान्याने स्थानिक कमी उंचीच्या औषधी वनस्पती) प्रजातीचे वनीकरण योजना राबविणेची आहे. सदर योजनेसाठी रक्कम वनक्षेत्रपाल यांचेकडून प्राप्त करुन घेण्यांत येऊन कळविणेत येत आहे.

24) अट क्रमांक 25 - प्रकल्पामुळे बाधीत होणारे प्रस्तावीत वनक्षेत्रांतील पशुपक्षी यांचेसाठी कृत्रीम आधिवास निर्माण करणे आवश्यक राहील त्यासाठी आवश्यक असणारी रक्कम वनक्षेत्रपाल यांचेकडून प्राप्त करुन वेगळयाने कळविणेत येत आहे.

25) अट क्रमांक 26 - डोंगराळ भागांत लाईन टाकतेवेळी आवश्यकतेपेक्षा जास्त क्लिअरन्स मिळत असल्याने अशा भागातील वृक्षतोड करण्यांत येऊ नये.

26) अट क्रमांक 27 - वन हक्क अधिनियम 2006 नुसार जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील वनहक्क बाधीत होत नसल्याबाबत प्रमाणपत्र, केंद्रशासनाकडील दिनांक 5/7/2013 अन्वये विहित केलेल्या नमुन्यांत सादर करावा.

27) अट क्रमांक 28 - मृदसंधारणाचे काम ज्या-ज्या ठिकाणी करणे आवश्यक वाटेल त्या त्या ठिकाणी प्रकल्प यंत्रणेने त्यांचे खर्चाने करणे आवश्यक राहील.

28) अट क्रमांक 29 - सदर प्रस्तावामुळे प्रस्ताव क्षेत्रात अस्तित्वात असलेले वन व वन्यजीवांना त्रास होणार नाही याची हमी प्रकल्प यंत्रणेने घेणेची आहे.

29) अट क्रमांक 30 - प्रकल्प यंत्रणेने या प्रकल्प करीता लागू असलेले विविध अधिनियम, नियम व अटी तसेच मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

30) अट क्रमांक 31 – पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावीत क्षेत्राचे जिओ-रेफरन्सेस व केएमएल फाईल राज्यशासनाने दाखल करणे बंधनकारक राहील.

31) अट क्रमांक 33 – महाराष्ट्र वन विभागाने प्रस्ताव कैंद्रशासनाकडे सादर करतेवेळी टाकलेल्या इतर अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

32) अट क्रमांक 34 - पर्यावरण व वन मंत्रालयांने वन व वन्यजीव विकास व संवर्धन या दृष्टीने वेळो वेळी घातलेल्या व घालणेत येणा-या इतर अटी प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक राहतील.

वरील प्रमाणे सर्व रक्कम सदर रक्कम www.forestclearance.nic.in या संकेत स्थळावर लॉगइन करुन चलन जनरेट करुन भरणा करावी व भरणा केलेले चलनाची प्रत या कार्यालयास पुर्तता अहवाला समवेत पाठविण्यात यावी.

आपणाकडून वरील अटींची पूर्तता करणेत आलेवर सदर प्रस्तावास अंतीम मान्यता घेणेकामी अहवाल वरीष्ठांमार्फत केंद्रशासनाकडे सादर करणेत येईल.

वरील प्रस्तावांत केंद्रशासनाकडून व राज्य शासनाकडून अंतीम मान्यता प्राप्त होत नाही तो पर्यंत कोणत्याही प्रकारे वनेत्तर कामे करण्यात येऊ नये ही विनंती.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतः- वनक्षेत्रपाल, नागोठणे व वडखळ यांचेकडे माहितीसाठी व तत्वतः मंजुरी पत्रातील अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेकडून करुन घेणेसाठी रवाना. तसेच प्रकरणी अट क्र. 24 मधील सुचनांनुसार औषधी वनस्पती लागवड व विस्थापित होणारे पक्षी यांचे निवा-यासाठी कृत्रीम घरटी बनविणेसाठी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकासह रक्कम कळविणेत यावी.

प्रतः- वनक्षेत्रपाल, सुधागड यांचेकडे माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, अलिबाग यांचेकडे माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतः- वनक्षेत्र सर्व्हेक्षक, अलिबाग यांचेकडे माहितीसाठी व पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावीत केलेले अवनत क्षेत्र टोपोशिटवर दर्शवून तात्काळ जरुरी कार्यवाही करणेसाठी रवाना.